श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर.

पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पीजीए-१००९/प्र.क्र.२९/०९/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः- २१ ऑक्टोंबर, २०१०

वाचा:-१) शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र क्र.पीजीए-१००९/प्र.क्र.२९/०९/शिक्षण-२, दि.१५.४.२००९ व क्र.पीजीए-१००८/प्र.क्र.३६/०८/शिक्षण-२, दि. १६.०४.२००८.

२) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांचे पत्र एफ.क्र.आर-१३०११/१४/२००९-ईपी, दि.०६.१०.२०१०.

प्रस्तावना:- श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर या संस्थेस १. आयुर्वेद संहिता, २. कायाचिकीत्सा, ३. रसशास्त्र, ४. रचना शरीर, ५. स्वस्थवृत्त, ६. प्रसुतितंत्र एवं स्त्रीरोग, ७. कौमारभृत व ८. शल्यतंत्र (सामान्य) या एकुण ८ विषयातील आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास संदर्भ क्र.(१) अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.(२) अन्वये केंद्र शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (आयुष विभाग), नवी दिल्ली यांनी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून वरील एकुण ८ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रत्येकी ६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार या संस्थेस सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून वरील एकुण ८ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रत्येकी ६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- केंद्र शासनाने उपरोक्त संदर्भ क्र. (२) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर या संस्थेस सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून १. आयुर्वेद संहिता, २. कायाचिकीत्सा, ३. रसशास्त्र, ४. रचना शरीर, ५. स्वस्थवृत्त, ६. प्रसुतितंत्र एवं स्त्रीरोग, ७. कौमारभृत व ८. शल्यतंत्र (सामान्य) या विषयातील आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) या आयुर्वेद महाविद्यालयातील वरील एकुण ८ विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०६ एवढी राहील.

२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, केंद्रिय भारतीय चिकीत्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत दि. ०६.१०.२०१० च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.ला.ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
प्राचार्य, श्री. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, कोल्हापूर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट मेडिकल ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री.जी.हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई-०१
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)